माहितीचा अधिकार

# महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर
## माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये प्राप्त झालेले द्वितीय अपील

**अपील क्रमांक : ४०८/२०२२**

**अपिलार्थी** – श्री. गजानन महादेवराव महाजन

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा कार्यालयीन अधिक्षक,**
**नागपूर वनविभाग, नागपूर**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपवनसंरक्षक,**
**नागपूर वनविभाग, नागपूर**

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : १९.०३.२०२४**

| | | |
|---|---|---|
| **अपीलकर्ता** | : | **अनुपस्थित** |
| **जन माहिती अधिकारी** | : | **उपस्थित** |
| **प्रथम अपिलीय अधिकारी** | : | **उपस्थित (प्रतिनिधी)** |

| मूळ अर्जाचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपीलाचा दिनांक | प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा / आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|
| १५.११.२०२१ | निरंक | १५.१२.२०२१ | निरंक |

अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ६ (१) नुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे **दि. १५.११.२०२१** रोजी माहितीचा अर्ज सादर केला असून त्यात त्यांनी "दि. २२.०६.२०२१ रोजीच्या तक्रारीवर केलेल्या कार्यवाहीबाबत", माहिती मागितलेली आहे. सदर माहिती अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी कुठलाच प्रतिसाद दिल्याचे दिसून येत नाही. तदनंतर अपिलार्थी यांनी **दि. १५.१२.२०२१** रोजी कलम १९ (१) नुसार प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे "माहिती मिळाली नाही" असे कारण नमूद करून प्रथम अपील दाखल केले. त्यावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेवून आदेश पारित केल्याचे दिसून येत नाही.

अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) नुसार आयोगाकडे **दि. १४.०२.२०२२** रोजी "प्रथम अपिलीय अधिकाऱ्याकडून प्रतिसाद नाही" असे कारण नमूद करून द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर द्वितीय अपील अर्ज आयोग कार्यालयास दि. १४.०२.२०२२ रोजी प्राप्त झाला आहे. त्यावर आज दि. १९.०३.२०२४ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली असून सुनावणी दरम्यान अपिलार्थी अनुपस्थित आहेत. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधिक्षक, नागपूर वनविभाग, नागपूर, श्री. बी. एल. इवनाते उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपवनसंरक्षक, नागपूर वनविभाग, नागपूर यांच्यातर्फे श्री. मनोज धनविजय, सहाय्यक वन संरक्षक, उमरेड.

सदर प्रकरणातील उपलब्ध कागदपत्रे व सुनावणी दरम्यान उत्तरवादी यांनी केलेल्या युक्तीवादावरून असे निदर्शनास आले की, अपिलार्थी, श्री. गजानन महादेवराव महाजन यांनी दि. १५.११.२०२१ रोजी दाखल केलेल्या जोडपत्र अ नुसार दक्षिण उमरेड येथील वनपरिक्षेत्र अधिकारी यांच्याविरुध्द दि. २२.०६.२०२१ रोजी केलेल्या तक्रारीवर करण्यात आलेल्या कार्यवाहीचा तपशिल मागितला असून तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधिक्षक यांनी दि. ११.११.२०२१ रोजी अपिलकर्ता यांना अर्जातील तपशिल क्र. १ ची माहिती प्रशासकीय कारणास्तव प्रलंबित होती व मुद्दा क्र. २ ची माहिती याआधीच पुरविण्यात आली असल्याचे नमूद करीत प्रतिसाद दिला असून अपिलकर्ता यांना दि. ११.११.२०२१ रोजी पुरविण्यात आलेल्या माहितीबाबत नोंदणीकृत टपालाची पोचपावती तसेच आवक जावक रजिस्टर मधील पृष्ठांची छायांकित प्रत देखील पुरविण्यात आलेली आहे. त्याविरुध्द अपिलार्थी, श्री. महाजन यांनी दि. १५.१२.२०२१ रोजीच प्रथम अपील अर्ज दाखल केला असून त्यावर सुनावणी देखील घेण्यात आली नसल्याचे नमूद करीत दि. १४.०२.२०२२ रोजी द्वितीय अपील अर्ज दाखल केला असून त्यात शास्ती कारवाईची मागणी तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांचेविरुध्द माहिती अधिकार कायद्याच्या तरतुदींचे उल्लंघन केल्याबद्दल कार्यवाहीची मागणी केलेली आहे.

अपिलार्थी यांनी दाखल केलेल्या प्रथम अपील अर्जावर, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी विहित मुदतीत सुनावणी घेऊन आदेश पारित करणे अपेक्षित आहे. या प्रकरणी जन माहिती स्तरावरूनच माहिती प्रदान करण्यात आली असल्याचे तसेच प्रथम अपील अर्जावर सुनावणी घेण्यात आली नसल्याचे नमूद केलेले आहे. अपिलार्थी जरी आज अनुपस्थित असले तरी त्यांच्या अपील अर्जात दि. १४.०२.२०२२ रोजीच्या दिनांकापर्यंत त्यांना माहिती प्राप्त झाली नसल्याचे त्यांनी सुस्पष्टपणे नमूद केले असून विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी दि. ११.११.२०२१ रोजी तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधिक्षक यांनी अपिलकर्ता, श्री. महाजन यांना पाठविलेल्या माहितीची एक छायांकित प्रत माहिती अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत पुरविण्यात आलेली माहिती या शिक्क्यासह व माहिती अधिकाराच्या लोगोसह अपिलार्थीस पुनश्च: एकदा अपिलार्थीस प्रदान करण्याच्या निर्देशासह प्रस्तुत द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

## आदेश

**उपरोक्त आदेशाच्या अधीन राहून, प्रस्तुत द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**(राहुल भा. पांडे)**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ नागपूर**

महाराष्ट्र राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर
सत्यमेव जयते

**ठिकाण : नागपूर**
**दिनांक : १९.०३.२०२४**

जावक क्रमांक --------6175--------------दिनांक --16 AUG 2024--------------------

c:\users\rma\desktop\prajakta\appeal order\19.3.2024\408-2022.docx